AMC (GAD)
kindly circulate to
HOD's
18/10

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदींनुसार व्यापक जनहिताशी संबंध नसलेली वैयक्तिक स्वरुपाची माहिती न पुरविण्याबाबत

# महाराष्ट्र शासन
## सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः संकीर्ण २०१२/९८९/प्र.क्र.४७९/सहा,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख: १७ ऑक्टोबर,२०१४

९८००
१८/१०/१४

परिपत्रक :-

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ मध्ये जी माहिती पुरविण्याचे आबंधन माहिती अधिकाऱ्यावर असणार नाही त्या बाबी नमूद करण्यात आल्या आहेत. याच कलमाच्या पोटकलम (ञ) मधील तरतूदीनुसार जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी, यथास्थिती केंद्रिय जन माहिती अधिका-याची, राज्य जन माहिती अधिका-याची किंवा अपील प्राधिका-याची खात्री पटली असेल, ती खेरीजकरुन, जी माहिती प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तीच्या खाजगी बाबीत आंगतुक हस्तक्षेप करील, अशी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधनही माहिती अधिका-यांवर नसल्याबाबत स्पष्टता करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर शासकीय कर्मचारी/अधिकाऱ्यास त्याच्या सेवाकालावधीत मिळालेली ज्ञापने, कारणे दाखवा नोटीस, शिक्षादेश, त्याच्या सेवा नियमांतर्गत कामगिरीबाबतचा अहवाल, त्याच्या चल/अचल संपत्तीबाबतची माहिती, त्याने केलेली आर्थिक गुंतवणूक वा बँक किंवा अन्य वित्तिय संस्थांकडून घेतलेली कर्जे, त्याच्या मुलांच्या विवाहात मिळालेल्या भेटी, आयकर विवरणपत्र यासारखी वैयक्तिक तपशीलासंबंधातील माहिती देण्याचे बंधन माहिती अधिका-यांवर नसल्याचा निर्णय स्पेशल लीव्ह पिटीशन क्र.२७७३४/२०१२ गिरिश रामचंद्र देशपांडे विरूध्द केंद्रीय माहिती आयोग या प्रकरणात दि.३.१०.२०१२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. या संदर्भात निर्णय देताना मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्णयपत्राच्या परिच्छेद १३ मध्ये पुढील प्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.

१३. We are in the agreement with the CIC and the courts below that the details called for by the petitioner i.e. copies of all memos issued to the third respondent, show cause notices and orders of censure/punishment etc. are qualified to be personal information as defined in clause (j) of section ८(१) of RTI Act. The performance of an employee/officer in an organization is primarily a matter between the employee and employer and normally those aspects are governed by the service rules which fall under the expression "personal information", the discloser of which would cause unwarranted invasion of privacy of that individual.

२. श्री.एच.ई.राजसरकरप्पा विरूध्द राज्य जन माहिती अधिकारी (याचिका क्र.१०६६३/२००६) मध्ये उच्च न्यायालय कर्नाटक यांनी दिलेल्या निर्णयाच्या आधारे विधि व न्याय विभागाने अनौ.संदर्भ

क्र.यु.ओ.आर. ४१०/१२६२/सिव्हील/कॉन्फिडेंस/अे ब्रँच/दि.३१.८.२०१२ अन्वये अभिप्राय देताना पुढील प्रमाणे निरीक्षण नोंदले आहे.

" ¤. the information which does not constitute any public interest and which would warrant overriding the provisions of Section८(१)(g)(j) of RTI Act, २००५ are not expected to be provided to the applicant under this Act, especially when it is intended to score the personal dispute with third party does not constitute public interest.

In view of above judgment of Karnataka High Court and the legal provision discussed above the State government can issue guidelines for the purpose of this Act as provided under Section २६(३)(a) of the RTI Act, २००५."

३. उपरोक्त पार्श्वभूमी लक्षात घेता सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, वरिलप्रमाणे तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ८ पोटकलम (ज) मधील तरतूदी नुसार जी माहिती देण्याचे बंधन माहिती अधिका-यांवर नाही अशी आणि लोकहिताच्या दृष्टीने व्यापक जनहित साध्य न करणारी किंवा विशेषत: जी त्रयस्थ पक्षाबरोबर उद्भवलेल्या वैयक्तिक वादांच्या अनुषंगाने मागविलेली माहिती, माहितीच्या अधिकारात अर्जदारास देण्यात येऊ नये.

३. सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणे व त्यांच्या अधिपत्याखालील जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना वरिलप्रमाणे सूचित करावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१०१७१५२५४९२६०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gosavi Pradeep P

Digitally signed by Gosavi Pradeep P
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Gosavi Pradeep P
Date: 2014.10.17 15:41:05 +05'30'

( प्र.प्र.गोसावी )
शासनाचे उपसचिव

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/सचिव
३) उप सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई